अक्षरा फर्निचर
पिंटू वाचणीकर
Mob : 9545383536
8087633536

आमच्याकडे किचन ट्रॉली, लॉफ्ट दरवाजे, काडाप्पा दरवाजे, डायनिंग टेबल, ऑर्डर प्रमाणे घरगुती व ऑफिससाठी लागणारे फर्निचर तयार करून मिळेल.
वाशी नाका रोड, तुलसी हॉस्पिटल शेजारी, कळंबा

# वार्ता सम्राट

संपादक : प्रकाश कांबळे (लिंगनूरकर)

Postal Reg.No.KLP-346/2026-2028 RNI No.MAHMAR/2016/72710 email :vartasamrat@gmail.com

* वर्ष १० वे * अंक ३९ वा *बुधवार दि.५ ऑगस्ट २०२६ * पृष्ठ ४ * किंमत ५ रूपये *

# कुमार विद्यामंदिर चिखली येथे सायबर सिक्युरिटीचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण

## क्विक हील फाऊंडेशन व देवचंद महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम; मोबाईल गेम्सच्या व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन

चिखली/प्रतिनिधी :डिजिटल युगात विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने क्विक हील फाऊंडेशन आणि देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर यांच्या संयुक्त विद्यमाने कुमार विद्यामंदिर,चिखली (ता.कागल) येथे सायबर सिक्युरिटी विषयावरील प्रात्यक्षिक प्रशिक्षण उत्साहात पार पडले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, ऑनलाइन फसवणुकीपासून संरक्षण तसेच मोबाईल गेम्सच्या दुष्परिणामांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.


प्रशिक्षक विद्यार्थिनी वैष्णवी सुतार व सानिका रानगे यांचा शाळेच्या वतीने गुलाबरोपे भेट देऊन पर्यावरणपूरक सत्कार करतांना उपस्थित नामदेव चौगुले व शिक्षक


विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, ऑनलाइन फसवणुकीपासून संरक्षण तसेच मोबाईल गेम्सच्या दुष्परिणामांविषयी मार्गदर्शन करतांना सारिका रानगे व वैष्णवी सुतार

देवचंद महाविद्यालयाच्या बीसीए विभागातील विद्यार्थिनी वैष्णवी सुतार आणि सानिका रानगे यांनी विद्यार्थ्यांना फिशिंग, बनावट लिंक,ओटीपी फसवणूक, सोशल मीडिया हॅकिंग, डिजिटल गोपनीयता, मजबूत पासवर्डचे महत्त्व आणि सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याची माहिती प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह दिली.

BGMI (PUBG), Free Fire, Call of Duty Mobile, Clash of Clans, Candy Crush यांसारख्या ऑनलाइन गेम्सच्या आहारी गेल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, मानसिक आरोग्यावर आणि सामाजिक जीवनावर होणारे दुष्परिणाम उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले. डिजिटल साधनांचा योग्य आणि मर्यादित वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले.

प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून सक्रिय सहभाग नोंदविला. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण बाबी सहज समजल्या.क

यावेळी प्रशिक्षक विद्यार्थिनी वैष्णवी सुतार व सानिका रानगे यांचा शाळेच्या वतीने गुलाबरोपे भेट देऊन पर्यावरणपूरक सत्कार करण्यात आला. डिजिटल सुरक्षिततेसोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरला.

यावेळी सतीश राशिवडे, विशाल नुल्ले, शहिनाज सय्यद, नामदेव चौगुले, सूर्यकांत पाटील, संजय खुडे, ज्योती जिरगे , शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायबर साक्षरता आणि पर्यावरण संवर्धनाचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. उपस्थितांनी क्विक हील फाऊंडेशन, देवचंद महाविद्यालय आणि कुमार विद्यामंदिर, चिखली यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.